जीपी पारसिक सहकारी बँक लि.
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

स्वर्गीय गोपीनाथ शिवराम पाटील
संस्थापक-अध्यक्ष (एम. कॉम., एल.एल.बी.)

५५ वा वार्षिक अहवाल
२०२५-२६

जीपी पारसिक सहकारी बँक लि.

(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

आमचे श्रध्दास्थान

स्वर्गीय गोपीनाथ शिवराम पाटील
संस्थापक-अध्यक्ष (एम. कॉम., एल.एल.बी.)

संचालक मंडळ

श्री. विक्रम गो. पाटील
अध्यक्ष
(बी.कॉम)



श्री. प्रकाश न. पाटील
उपाध्यक्ष

श्री. रणजीत गो. पाटील
संचालक
(एम.कॉम)

श्री. नारायण ग. गावंड
संचालक

श्री. केसरीनाथ बा. घरत
तज्ञ संचालक
(बी.ए. सीएआयआयबी पार्ट-१)

श्री. दशरथ का. पाटील
संचालक
(बी.ए.)

श्री. कय्युम र. चेऊलकर
संचालक

श्री. नवनाथ मा. पाटील
संचालक

डॉ. संजय वि. पोपेरे
संचालक
(एमबीबीएस, एमएस.ऑथो. सर्जन)

सौ. राजश्री प्र. पाटील
संचालिका
(एम.कॉम, एम.बी.ए.)

सौ. प्रतिभा स. म्हात्रे
संचालिका
(बी.ए.)

सीए रमाकांत रा. लाहोटी
तज्ञ संचालक
(बी.कॉम, एलएलबी (जन) एफसीए

श्री. दिनेश बी. शेट्टी
तज्ञ संचालक
(बी.एससी, पीजीडीसीए)
(दि.२३/०२/२०२६ पर्यंत)



श्री. विजय एम. भोसले
मुख्य कार्यकारी अधिकारी
(बी.कॉम)

स्वर्गीय दशरथ दत्तू घरत

(ज्येष्ठ संचालक)

बँकेचे ज्येष्ठ संचालक स्वर्गीय दशरथ दत्तू घरत यांना
बँकेचे संचालक, सभासद, हितचिंतक व कर्मचारी वर्ग यांच्यातर्फे

विनम्र श्रध्दांजली

जीपी **पारसिक** सहकारी बँक लि.
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

जीपी पारसिक सहकारी बँक लि., कळवा-ठाणे (मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

(Reg.No. MSCS/CR/1213/2015. Dtd. 26th March, 2015)

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

बँकेची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २३ ऑगस्ट, २०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता खालील विषयांकरिता **'राम गणेश गडकरी रंगायतन', तलावपाळी, ठाणे - ४००६०१** येथे घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेपुढील विषय

१) दि. २४ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या ५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वाचून कायम करणे.

२) वार्षिक अहवाल विचारार्थ ठेवणे व त्यास मंजुरी देणे ज्यामध्ये संचालक मंडळ अहवाल, दि. ३१ मार्च, २०२६ अखेरचा वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यांचा समावेश आहे.

३) सन २०२४-२५ सालच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या दोषदुरुस्ती रिपोर्टला मान्यता देणे.

४) संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०२६ अखेरच्या नफा वाटणीस व लाभांश वाटणीस मंजुरी देणे.

५) सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६) सन २०२६-२७ करिता वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे सेवा शुल्क ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे. संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मे. प्रकाश जी. पाठक ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस् यांची सन २०२६-२७ करिता वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक करण्याची मान्यता दिली आहे.

७) मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ कलम ३९(३) अनुसार बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडे २०२५-२६ या आर्थिक वर्षअखेर येणेबाकी असलेल्या कर्जांची माहिती घेणे.

८) सर्वसाधारण सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर राहिल्यास त्यांची रजा मंजूर करणे.

९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
श्री. विजय मनोहर भोसले
मुख्य कार्यकारी अधिकारी

दिनांक : ०७/०८/२०२६
ठिकाण : पारसिक नगर, कळवा, ठाणे - ४००६०५.

टिप : १) गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल व त्या सभेस पोटनियम क्र. ३० (c) नुसार गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२) ज्या सभासदांना वार्षिक सभेत काही सूचना करावयाच्या किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि.१४/०८/२०२६ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत त्यांच्या सूचना अथवा प्रश्न लेखी स्वरुपात द्यावेत. दि. १४/०८/२०२६ पर्यंत दिलेल्या मुदतीत लेखी स्वरुपात आलेल्या सूचना अथवा प्रश्नांचीच दखल घेण्यात येईल.

३) सभासदांव्यतिरिक्त अन्य कोणासही प्रवेश दिला जाणार नाही.

४) वार्षिक अहवाल व नोटीसची प्रत बँकेच्या वेबसाईट **www.gpparsik.bank.in** वर प्रसारित केली आहे.

५) बँकेचा वार्षिक अहवाल आपल्या जवळच्या शाखेत उपलब्ध असून सभासदांनी घेऊन जावा.

बोर्ड ऑफ मॅनेजमेंट

सदस्यांचे नांव	पदनाम	शिक्षण
श्री. रणजीत गो. पाटील	अध्यक्ष	एम. कॉम.
श्री. केसरीनाथ बा. घरत	सदस्य	बी.ए. सीएआयआयबी पार्ट-१
सीए. रमाकांत आर. लाहोटी	सदस्य	बी. कॉम. एलएलबी.(जन) एफसीए.
सीए. शेखर एम. कुलकर्णी	सदस्य	बी. कॉम. एफसीए. डीआयएसए (आयसीएआय)
श्री. प्रदीप पी. म्हात्रे	सदस्य	बी. कॉम. एलएलबी., सीएआयआयबी.
श्री. सुरेश डी. भोईर	सदस्य	बी. कॉम. एलएलबी.

वरिष्ठ व्यवस्थापन

नांव	पदनाम	शिक्षण
श्री. विजय मनोहर भोसले	मुख्य कार्यकारी अधिकारी	बी. कॉम.
श्री. राजीव लक्ष्मण माईणकर	महाव्यवस्थापक	बी. कॉम., सीएआयआयबी.
श्री. वासुदेव कृष्णा गुराम	महाव्यवस्थापक दि. ०२/१२/२०२५ पासून	एम. कॉम., डिप्लोमा इन युसीबी, सीआयएसए, जीडीसी ॲण्ड ए, सीएआयआयबी.
सौ. चित्रा रामकृष्णन	महाव्यवस्थापक दि. ०१/१०/२०२५ पर्यंत	बी.एससी., एम.बी.ए.(बँकिंग ॲण्ड फायनान्स), एल.एल.बी., सीएआयआयबी. डिप्लोमा (परसोनेल मॅनेजमेंट ॲण्ड इंडस्ट्रीअल रिलेशनशीप), डिप्लोमा इन इंटेलेक्च्युल प्रॉपर्टी राईटस मॅनेजमेंट.

बँकर्स

१	रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई			१३	येस बँक लि.
२	महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.			१४	ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
३	बँक ऑफ बडोदा	८	एच.डी.एफ.सी. बँक लि.	१५	कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
४	स्टेट बँक ऑफ इंडिया	९	कॅनरा बँक	१६	इंन्डस्इंड बँक लि.
५	युनियन बँक ऑफ इंडिया	१०	एसव्हीसी को-ऑप. बँक लि.	१७	आरबीएल बँक लि.
६	आय.डी.बी.आय. बँक	११	ॲक्सीस बँक लि.	१८	कोटक महिंद्रा बँक लि.
७	बँक ऑफ इंडिया	१२	आय.सी.आय.सी.आय. बँक लि.	१९	कॉर्पोरेशन बँक

वैधानिक लेखापरीक्षक

मे. एन. एस. गोखले ॲण्ड कंपनी,
चार्टर्ड अकौंटंटस्,
ठाणे -४००६०४

कन्करंट / इंटरनल ऑडीटर्स

मे. धनंजय जे. गोखले ॲण्ड कंपनी,
चार्टर्ड अकौंटंटस्,
व बँकेच्या पॅनेलवरील इतर सीए फर्मस्

GP PARSIK SAHAKARI BANK LTD., (Multi-state Scheduled Bank) Kalwa Thane-400605

(Reg.No. MSCS/CR/1213/2015. Dtd. 26th March, 2015)

Notice of Annual General Meeting

The 55th Annual General Meeting of the Bank is scheduled on **Sunday 23rd August, 2026** at 10.30 a.m. at **'Ram Ganesh Gadkari Rangayatan', Talao Pali, Thane - 400601** to transact the following business. All the members are requested to remain present at the meeting.

Agenda

1) To read and confirm the minutes of 54th Annual General Meeting held on 24.08.2025.
2) To consider and approve the Annual Accounts which consist of the report of Board of Directors, the report of Statutory Auditors, Profit & Loss A/c. and Balance Sheet of the Bank as at 31st March, 2026.
3) To approve the Compliance Report of Statutory Audit for the year 2024-25.
4) To approve appropriation of Profit and declaration of dividend for the year ending 31st March, 2026 as recommended by the Board of Directors.
5) To approve the Annual Budget for the year 2026-27.
6) To appoint Statutory Auditors for the year 2026-27 and to authorize the Board of Directors to fix their remuneration. On the recommendation of the Board of Directors RBI has approved the appointment of M/s. Prakash G. Pathak & Co.,Chartered Accountants as Statutory Auditors for the Year 2026-27.
7) Pursuant to section 39(3) of the Multi-State Co-operative Societies Act, 2002 to take note of the loans and advances outstanding from the Directors and their relatives as on year ending 2025-26.
8) To condone the absence of members in the Annual General Meeting.
9) Any other business with the permission of the Chair.

By the order of the Board of Directors

Shri. Vijay Manohar Bhosale

Chief Executive Officer

Date : 07/08/2026

Place : Parsik Nagar, Kalwa, Thane- 400605.

Note :

1) If there is no quorum within half an hour after appointed time, meeting shall stand adjourned and will be held at 11.00 a.m. on the same day at same place and the agenda of the meeting shall be transacted irrespective of the quorum in terms of Bye Law No.30(c).
2) The members who wish to make any suggestion or ask any questions should submit the same in writing on or before 14/08/2026 at the Bank's Head Office during working hours. Only suggestion or questions submitted in writing upto 14/08/2026 will be considered.
3) The entry is restricted to members only.
4) The copy of the Notice and Annual Report is published on the Bank's website **www.gpparsik.bank.in**
5) The members can also collect the copy of Annual Report from the nearest branch of the Bank.

Board of Management

NAME OF THE MEMBERS	DESIGNATION	QUALIFICATION
Mr. Ranjit G. Patil	Chairman	M.Com.
Mr. Kesarinath B. Gharat	Member	B.A., CAIIB (I)
CA. Ramakant R. Lahoti	Member	B.Com. LLB.(Gen) F.C.A.
CA. Shekhar M. Kulkarni	Member	B.Com., F.C.A. DISA (ICAI)
Mr. Pradip P. Mhatre	Member	B.Com., LLB., CAIIB
Mr. Suresh D. Bhoir	Member	B.Com & LLB

SENIOR MANAGEMENT PERSONNEL

NAME	DESIGNATION	QUALIFICATION
Mr. Vijay Manohar Bhosale	Chief Executive Officer	B.Com.
Mr. Rajiv Laxman Mainkar	General Manager	B.Com., CAIIB.
Mr. Vasudev Krishna Guram	General Manager (w.e.f. 02/12/2025)	M.Com., Diploma in UCB, CISA, GDC & A, CAIIB,
Mrs. Chitra Ramakrishnan	General Manager (upto 01/10/2025)	B.Sc., MBA(Banking & Finance), LLB, CAIIB, Dip.(Personnel Management & Industrial Relations), Dip. Intellectual Property Rights Management

Bankers

1	Reserve Bank of India, Mumbai			13	Yes Bank Ltd.
2	Maharashtra State Co-op Bank Ltd.			14	Thane District Central Co-op. Bank Ltd.
3	Bank of Baroda	8	HDFC Bank Ltd.	15	Kolhapur District Central Co-op. Bank Ltd.
4	State Bank of India	9	Canara Bank	16	IndusInd Bank Ltd.
5	Union Bank of India	10	SVC Co-op. Bank Ltd.	17	RBL Bank Ltd.
6	IDBI Bank	11	Axis Bank Ltd.	18	Kotak Mahindra Bank Ltd.
7	Bank of India	12	ICICI Bank Ltd.	19	Corporation Bank

Statutory Auditors

M/s. N. S. Gokhale & Co.
Chartered Accountants.,
Thane-400604

Concurrent / Internal Auditors

M/s. Dhananjay J. Gokhale & Co.
Chartered Accountants.,
& Other CA Firms on the panel of the Bank

विभाग प्रमुख

श्री. अविनाश सु. कासार
(CIO)
को-ऑपरेटिव्ह इन्फॉर्मेशन ऑफिसर
ओम्बड्समन-नोडल ऑफिसर,
हेड ऑफ लिगल डिपार्टमेंट
(एम.कॉम, एल.एल.बी., जी.डी.सी.ॲण्ड ए, सीएआयआयबी-I, डिप्लोमा इन युसीबी)

श्री. उमेश गो. चव्हाण
(CRO)
चिफ रिस्क ऑफिसर
(बी.कॉम, एम.बी.ए., (बी. ॲण्ड एफ.), सीएआयआयबी, जी.डी.सी. ॲण्ड ए, डिप्लोमा इन युसीबी, डिप्लोमा इन ट्रेजरी ॲण्ड रिस्क मॅनेजमेंट)

श्री. मधुकर रा. गवळी
(CCO)
चिफ कंम्प्लायन्स ऑफिसर,
प्रिंसिपल ऑफिसर,
(FIU-INDIA) दि.१५/०१/२०२६ पर्यंत
(बी.कॉम, एल.एल.बी., सीएआयआयबी, जी.डी.सी. ॲण्ड ए, डिप्लोमा इन युसीबी)

श्री. श्याम बा. कांगणे
(CFO)
चिफ फायनान्शियल ऑफिसर
(बी.कॉम, एनआयएसएम, सीएआयआयबी, आयएफआरएस, एल.एल.बी., सीए)

सौ. कल्पना उ. सोनावणे
(CIO)
चिफ इन्फॉर्मेशन ऑफिसर
(बी.एससी., प्रोफेशनल बँकिंग आयटी., सीएआयआयबी, ॲडव्हान्स डिप्लोमा इन युसीबी, जी.डी.सी. ॲण्ड ए, केवायसी-ए.एम.एल., डीआयएसए-(आयटी सुरक्षा), सायबर गुन्हे आणि फसवणूक व्यवस्थापन, माहिती सुरक्षा बँकर) (दि.०७/१०/२०२५ पासून)

श्री. भास्करराव ची. सिरीकोंडा
(CISO)
चिफ इन्फॉर्मेशन सिक्युरिटी ऑफिसर
(बी.कॉम., एक्झिक्युटिव्ह एमबीए, प्रमाणित, आयएसओ, ऑडिटर-एआयक्यूएम, ओरॅकल, वेब डिझाईन आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट प्रमाणपत्र)
(दि.२३/०३/२०२६ पासून)

श्री. विकास व. देशमुख
(HIA)
(हेड ऑफ इंटरनल ऑडीट)
(बी.कॉम, जेएआयआयबी)

श्री. मनोहर पां. मढवी
(HIT)
(हेड ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजि)
(बी.कॉम, जी.डी.सी. ॲण्ड ए)
(दि. ०१/०६/२०२५ ते दि.०६/१०/२०२५)

श्री. हृदयनाथ ना. कडू
(Principal Officer-FIU-INDIA)
(प्रिसिंपल ऑफिसर FIU इंडिया)
(दि. १६/०१/२०२६ पासून)
(बी.कॉम, सीएआयआयबी, जी.डी.सी. ॲण्ड ए, डिप्लोमा इन युसीबी)

श्री. दिनानाथ पां. म्हात्रे
(Head of Account Opening)
(हेड ऑफ अकाऊंट ओपनिंग)
(बी.कॉम)

श्री. प्रविण रा. कदम
(Head of Credit Dept.)
(हेड ऑफ क्रेडिट डिपार्टमेंट)
(बी.कॉम, पीजीडीबीए-फायनान्स, सीएआयआयबी, आयआयबीएफ, जी.डी.सी. ॲण्ड ए)

श्री. रविंद्र रा. पाटील
(Head of Recovery Dept.)
(हेड ऑफ रिकव्हरी डिपार्टमेंट)
(एम.कॉम, सीएआयआयबी, पीजीडीबीए, जी.डी.सी. ॲण्ड ए)

श्री. प्रविण गो. लोखंडे
(Head of Clearing Dept.)
(हेड ऑफ क्लिअरिंग डिपार्टमेंट)
(बी.कॉम, सीएआयआयबी, जी.डी.सी. ॲण्ड ए, डिप्लोमा इन-युसीबी)

श्री. सुर्यकांत ज. सोनार
(Head of Secretarial Dept.)
(हेड ऑफ सेक्रेटरियल डिपार्टमेंट)
(बी.ए, जी.डी.सी. ॲण्ड ए)

श्री. राजेश दि. करलाद
(Head of Vigilance Dept.)
(हेड ऑफ व्हिजिलन्स डिपार्टमेंट)
(बी.कॉम, एल.एल.बी.,सीएआयआयबी, जी.डी.सी.ॲण्ड ए, डिप्लोमा इन-युसीबी, पोस्ट ग्रॅज्युएट इन एचआर)

श्री. दिपक सो. मंडलिक
(Head of Insurance Dept.)
(हेड ऑफ इन्शुरन्स डिपार्टमेंट)
(बी.कॉम)

श्री. किशोर रा. नाईक
(Head of Risk & Monitoring Dept.)
(हेड ऑफ रिस्क ॲण्ड मॉनिटरिंग डिपार्टमेंट)
(एम. एससी)

श्री. दर्शन अ. भोईर
(Head of Admin Dept.)
(हेड ऑफ ॲडमिन डिपार्टमेंट)
(बी.कॉम, जी.डी.सी. ॲण्ड ए,)

श्री. महेश श्रा. पाटील
(सिनिअर मॅनेजर)
(Cluster-I)
(बी.कॉम, जी.डी.सी. ॲण्ड ए)

श्री. किशोर ना. पाटील
(असिस्टंट जनरल मॅनेजर)
(Cluster-II)
(बी.कॉम,)

श्री. संजय कृ. भोईर
(असिस्टंट जनरल मॅनेजर)
(Cluster-III)
(एम.कॉम, जी.डी.सी. ॲण्ड ए, पीजीडीएम-एमबीए)

श्री. आसिफ रा. खान
(चिफ मॅनेजर)
(Cluster-IV)
(बी.कॉम, जी.डी.सी. ॲण्ड ए, डिप्लोमा इन-युसीबी, जेएआयआयबी)

श्री. गणेश ह. पांडे
(सिनिअर मॅनेजर)
(Cluster-V)
(बी.कॉम, जेएआयआयबी)

श्री. संकेत प. प्रभुदेसाई
(चिफ मॅनेजर)
(Cluster-VI)
(बी.कॉम, एम.बी.ए., सीएआयआयबी)

श्री. प्रविण बी. गोसावी
(सिनिअर मॅनेजर)
(Cluster-VII)
(बी फार्मसी, एम.बी.ए.)

५५ वा वार्षिक अहवाल (सन २०२५ - २६)

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय गोपीनाथ पाटील साहेब यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करुन बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने मी आपणा सर्वांचे बँकेच्या ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये हार्दिक स्वागत करीत आहे. दि. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षित ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक व सन २०२५-२६ चा ५५ वा वार्षिक अहवाल सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे.

आर्थिक परिस्थिती - जागतिक :-

''आजच्या आर्थिक जगात 'अनिश्चितता' ही सर्वात निश्चित असणारी गोष्ट आहे''. पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्थांवर मोठा प्रभाव पडला आहे. पश्चिम आशियातील संघर्ष आणि हॉर्मुझची सामुद्रधुनी (Strait of Hormuz) बंद झाल्यामुळे (ब्रेंट क्रूड) कच्च्या तेलाचे दर अत्यंत अस्थिर राहिले आहेत. वर्षाच्या सुरुवातीला (ब्रेंट क्रूड) कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल ७४.४९ अमेरिकन डॉलर होते, जे डिसेंबर २०२५ मध्ये कमी हाऊन ५८.९२ अमेरिकन डॉलर झाले आणि मार्च २६ मध्ये पुन्हा वाढून १०७.९३ अमेरिकन डॉलरवर पोहोचले.

जागतिक व्यापारातील अनिश्चितता आणि अडथळ्यांमुळे, आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाचे मूल्य घसरले. वर्षाच्या सुरुवातीला डॉलरचा विनिमय दर (Exchange rate) ₹ ८५.६० होता, जो मार्च २०२६ च्या शेवटी वाढून ₹ ९४.६५ झाला.

पश्चिम आशियातील संघर्षाची तीव्रता वाढण्याची शक्यता आणि निर्यात शुल्काचे धोके (tariff threats) हे मुख्य धोके आहेत, ज्यामुळे महागाई आणि आर्थिक वाढीच्या भविष्यातील वाटचालीबाबत मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. जागतिक आर्थिक वाढ ३.३% राहण्याचा अंदाज आहे.

आर्थिक परिस्थिती - भारत :-

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा (RBI) ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) महागाईचा अंदाज ४% होता, जो खाद्यपदार्थांच्या किंमतीतील सुधारणेमुळे डिसेंबर २०२५ मध्ये सुधारुन २% करण्यात आला. नवीन किंमत निर्देशांक मालिकेमुळे (२०२४=१००) फेब्रुवारी २०२६ मध्ये महागाईचा दर ३.२% वर पोहोचला. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी आरबीआयचा सुधारित महागाई अंदाज ४.१% आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी आरबीआयचा महागाईचा अंदाज ४.६% आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी वास्तविक जीडीपी वाढ दर ७.६% अंदाज वर्तविण्यात आला होता, जो आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ७.१% होता. घरगुती उपभोक्ता वाढ, स्थिर महागाई आणि कमी व्याजदर यामुळे या वाढीला बळ मिळाले.

आव्हानात्मक बाह्य वातावरण आणि भू-राजकीय अनिश्चितता असूनही भारतीय अर्थव्यवस्था उच्च वाढ नोंदवत आहे. अशा प्रकारे, भारतीय अर्थव्यवस्था किंमत स्थिरता आणि शाश्वत वाढीसह सातत्याने प्रगती करत आहे.

भारतीय बँकिंग क्षेत्र :-

रिझर्व्ह बँकेने वर्षादरम्यान पॉलिसी रेपो रेट १०० बेसिस पॉईंट्सने कमी करुन ६.२५% वरुन ५.२५% केला, तसेच सीआरआर

देखील १०० बेसिस पॉईंट्सने कमी करुन ४.००% वरुन ३.००% केला. आरबीआयने या वर्षात दोनदा आपले धोरण (policy stance) बदलले; प्रथम एप्रिल २०२५ मध्ये 'Neutral' वरुन 'Accommodative' केले आणि पुन्हा जून २०२५ मध्ये 'Accommodative' वरुन 'Neutral' केले आणि उर्वरित वर्षभर ते तसेच ठेवले. भांडवल पर्याप्तता (capital adequacy), तरलता (liquidity), मालमत्ता गुणवत्ता (asset quality) आणि नफा यासारख्या चांगल्या मापदंडांसह भारतीय बँकिंग क्षेत्र सुदृढ राहिले. यावर्षी भारतीय बँकिंग क्षेत्राच्या ताळेबंदात सुधारणा, तरलतेचे बफर, नफा आणि एकूण एनपीए (NPA) गुणोत्तरात घट दिसून आली. आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील ११.७% च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये कर्जाच्या वाढीमध्ये वार्षिक १४.३% ने वाढ झाली. बँका आणि वित्तीय संस्था शाश्वत कर्ज विस्ताराद्वारे आर्थिक वाढीला पाठबळ देत आहेत.

भविष्यातील दृष्टीकोन :-

ऊर्जा पुरवठ्यातील चालू असलेले अडथळे, सततचे भू-राजकीय तणाव, विविध उद्योगांसाठी मालाची (inputs) टंचाई आणि अस्थिर वित्तीय बाजारपेठांमुळे जागतिक आर्थिक दृष्टीकोन अनिश्चित बनला आहे. सुरक्षित गुंतवणुकीकडे (safe-heaven) वाढलेल्या ओघामुळे अमेरिकन डॉलरच्या तुलनेत प्रमुख चलनाचे मूल्य घसरले आहे.

भारतीय अर्थव्यवस्था ही वित्तीय, राजकीय आणि महागाई अशा तीन आघाड्यांवरील स्थिरतेमुळे अधिक मजबूत स्थितीत आहे. फेब्रुवारी २०२६ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेने चांगली वाढ नोंदवली आहे, परंतु पश्चिम आशियातील संघर्ष कच्चा तेलाच्या वाढलेल्या किंमती व पुरवठा साखळीतील अडथळे यांचा उद्योग, कृषी आणि सेवा क्षेत्रांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. एल निनो (El Nino) या प्रतिकूल हवामान परिस्थितीचे निर्माण हे आर्थिक वृद्धीसाठी एक संभाव्य संकट आहे. आरबीआयने आर्थिक २०२६-२७ साठी जीडीपी वृद्धीदर ६.९% राहण्याचा अंदाज वर्तवला आहे.

बँकेच्या आर्थिक प्रगतीचा धावता आढावा :-

वरील पार्श्वभूमीच्या अनुषंगाने बँकेची आर्थिक प्रगती चांगली झाली असून बँकेचा एकूण व्यवसाय ₹ ८२००.०१ कोटी व कर कपातीनंतरचा निव्वळ नफा ₹ ६५.६५ कोटी इतका झाला.

(रक्कम ₹ कोटीत)

तपशील	३१.०३.२०२६	३१.०३.२०२५	वाढ/(घट)
सभासद संख्या	११६४२७	११०९९५	५४३२
एकूण व्यवसाय	८२००.०१	७२०४.१८	९९५.८३
ठेवी	५२८६.९१	४७८४.१३	५०२.७८
गुंतवणूक	२८७३.७३	२७२९.११	१४४.६२
कर्जे	२९१३.१०	२४२०.०५	४९३.०५
ढोबळ नफा	९०.५७	८७.९०	२.६७
निव्वळ नफा	६५.६५	५९.७८	५.८७
भाग भांडवल	९४.१८	९२.२८	१.९०
स्वनिधी	५४०.६०	५०३.९२	३६.६८
खेळते भांडवल	६१८२.८८	५६२०.०५	५६२.८३
राखीव व इतर निधी	६१६.२९	५८३.२१	३३.०८
ढोबळ अनुत्पादित कर्जे	५४.४९	५६.३७	(१.८८)
निव्वळ अनुत्पादित कर्जे (%)	०.००%	०.००%	०.००%
भांडवल पर्याप्तता प्रमाण (%)	१९.३१%	१९.६७%	(०.३६%)

ठेवी :-

सन २०२५-२६ या कालावधीत बँकेच्या एकूण ठेवींमध्ये ₹ ५०२.७८ कोटीने वाढ झाली असून त्याचे प्रमाण १०.५१% इतके आहे, तसेच सन २०२४-२५ मध्ये सदर ठेवींची वाढ ही ₹ १७७.४९ कोटी इतकी होती, त्याचे प्रमाण ३.८६% इतके होते. सदर वाढ कमी व्याजदरांच्या ठेवींमध्ये झाली आहे. तसेच बँकेने सहकार क्षेत्रात CASA ठेवींमध्ये अग्रस्थान ठेवले आहे. सदर ठेवींचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

(रक्कम ₹ कोटीत)

ठेवींचा प्रकार	२०२५-२६	टक्केवारी	२०२४-२५	टक्केवारी
चालू ठेवी	७०८.११	१३.३९%	६०७.२३	१२.६९%
बचत ठेवी	२०९९.३५	३९.७१%	१९१२.९९	३९.९९%
मुदत ठेवी	२४७९.४५	४६.९०%	२२६३.९१	४७.३२%
एकूण	५२८६.९१	१००.००%	४७८४.१३	१००.००%
कासा	२८०७.४६	५३.१०%	२५२०.२२	५२.६८%

ठेवींचा विमा :-

रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार बँकेने डिपॉझीट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरेंटी कॉर्पोरेशन येथे प्रत्येक ठेवीदाराकरिता ₹ ५ लाखापर्यंतच्या ठेवींचा विमा काढला आहे.

कर्जव्यवहार :-

वर्षाच्या सुरुवातीला बँकेच्या कर्जठेवींचे प्रमाण (CD Ratio) सुमारे ५०% होते. वर्षाच्या अखेरीस किमान ५५% कर्जठेवींचे प्रमाण गाठण्याचे बँकेने उद्दिष्ट ठेवले होते आणि या दिशेने बँकेने एकत्रित प्रयत्न केले आणि मला कळविण्यात आनंद होत आहे की, वर्षाच्या अखेरीस कर्जठेवींचे प्रमाण ५५% पेक्षा जास्त झाले आहेत.

आर्थिक वर्ष २०२५-२६ या कालावधीत कर्जांमध्ये एकूण ₹ ४९३.०५ कोटींनी वाढ झाली. सन २०२४-२५ अखेर बँकेची एकूण कर्जे ₹ २४२०.०५ कोटी होती. त्यात वाढ होऊन सन २०२५-२६ अखेर एकूण कर्ज रक्कम ₹ २९१३.१० कोटी इतकी झाली आहे. कर्ज पुरवठ्यातील ही वाढ प्रामुख्याने किरकोळ क्षेत्रात विशेषतः गृहनिर्माण, वाहन इत्यादी क्षेत्रांमध्ये झाली आहे. एकूण कर्ज पोर्टफोलिओ मध्ये किरकोळ कर्जाचा वाटा जवळपास ७०% आहे. सन २०२५-२६ मध्ये एकूण ₹ २९१३.१० कोटी कर्जापैकी ५२.२९% कर्जे ही अग्रक्रम क्षेत्रातील कर्जे असून त्यापैकी ११.५४% दुर्बल घटकांना दिलेली कर्जे आहेत. आपली बँक कर्ज मंजूर करताना कर्जदाराची पत, व्यवसाय, कर्ज परतफेड करण्याची क्षमता, तारण मालमत्ता इत्यादी निकषांचा विचार करून पतपुरवठा करत असते. या संपूर्ण निकषांची सांगड घालून बँकेने क्रेडिट रेटींग मॉड्युल तयार केले आहे जेणे करून बँकेच्या कर्जांची गुणवत्ता राखण्यास मदत होईल. निव्वळ व्याज दुराव्यामध्ये तडजोड न करता कर्जाची चांगली गुणवत्ता राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

आम्हाला सभासदांना कळविण्यात आनंद होत आहे की, व्यवसायातील एकूण वाढ सुमारे ₹ ९९५ कोटी (मागील वर्षी ₹ ५२५ कोटी) झाली आहे. जी आपल्या बँकेच्या इतिहासातील सर्वाधिक आहे.

थकबाकी व अनुत्पादित कर्जाचे व्यवस्थापन :-

दि. ३१ मार्च, २०२५ अखेर बँकेची अनुत्पादित (NPA) कर्जे ₹ ५६.३७ कोटी इतकी होती. त्यामध्ये ₹ १.८८ कोटीने घट

होऊन दि. ३१ मार्च, २०२६ अखेर ₹ ५४.४९ कोटी इतकी झालेली आहेत. बँकेच्या एकूण अनुत्पादित (NPA) कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण १.८७% इतके आहे. जो की बँकिंग क्षेत्रातील सर्वात कमीत कमी पैकी एक आहे. ज्या कर्जदारांचे कर्ज एनपीए झाले आहे त्यांच्याकडून थकबाकी वसूल करण्यासाठी बँकेचे प्रयत्न सातत्याने सुरु आहेत. तसेच बँकेने एनपीए मध्ये गणले गेलेले खाते वसूल करण्यासाठी एक सुस्पष्ट प्रक्रिया आखली आहे. ज्यामध्ये कर्जदार व जामीनदार यांचा नियमित पाठपुरावा तसेच आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई यासह बहुआयामी दृष्टीकोन समाविष्ट आहे. यामुळे बँकेला निव्वळ अनुत्पादित (NPA) कर्जाचे प्रमाण ०.००% इतके ठेवण्यास मदत झाली आहे. बँकेने NPA साठी केलेल्या तरतुदीची कव्हरेज गुणोत्तर २४१.२६% इतके मजबूत आहे.

तसेच बँकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये निर्लेखित केलेल्या कर्जखात्यांमध्ये ₹ ०.०७ कोटी इतकी रक्कम वसूल केलेली आहे. तसेच बँकेच्या तडजोड व समजोता योजनेनुसार (Compromise Settlement Scheme-CSS) नुसार एकूण २६ अनुत्पादित खात्यांमध्ये तडजोड करुन एकूण ₹ ०.८२ कोटी इतकी वसुली केली आहे.

(रक्कम ₹ कोटीत)

तपशील	२०२५-२६	टक्केवारी	२०२४-२५	टक्केवारी
ढोबळ अनुत्पादित कर्ज	५४.४९	१.८७%	५६.३७	२.३३%
निव्वळ अनुत्पादित कर्ज	०.००	०.००%	०.००	०.००%
आवश्यक तरतूद	४१.८८	-	४५.०२	-
एकूण केलेली तरतूद	१३१.४६	-	१२८.४६	-
जास्तीची केलेली तरतूद	८९.५८	-	८३.४४	-
एकूण कर्ज	२९१३.१०	-	२४२०.०५	-
कव्हरेज प्रमाण	२४१.२६%	-	२२७.८९%	-

बँक बहुराज्यीय कायद्यानुसार थकीत कर्जदारांवर The Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 (SARFAESI) व Arbitration & Conciliation Act, 1996 अंतर्गत वसुलीचा अधिकार वापरु शकते. सुप्रीम कोर्ट तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या निर्देशांनुसार कर्ज वसुली करिता बँकेचे थकीत कर्जदार तसेच Wilful Defaulters यांचे जामीनदारासह फोटो इतर तपशिलांसह वृत्तपत्र तसेच इतर प्रसार माध्यमातून बँकेस प्रसिध्द करता येऊ शकतात. सर्व थकीत कर्जदार सभासदांना नम्र विनंती आहे की, त्यांनी थकबाकीची रक्कम भरावी व त्यांच्याविरुध्द अशा प्रकारच्या कठोर उपाययोजनांची अंमलबजावणी करावी लागू नये यासाठी बँकेस सहकार्य करावे.

गुंतवणूक :-

बँकेची गुंतवणूक ही प्रामुख्याने वैधानिक तरलतेचे व बिगर वैधानिक तरलतेचे रोखे व बँकेतील मुदतठेवींमध्ये आहे. त्याचप्रमाणे बँक अतिरिक्त शिल्लक निधी कॉलमनी आणि रिर्झव्ह बँकेच्या रिव्हर्स रेपो द्वारे कर्जाऊ देते. बँकेची एकूण गुंतवणूक ₹ २८७३.७३ कोटी असून त्यापैकी ₹ १६८७.२३ कोटीची गुंतवणूक ही सरकारी रोख्यांमध्ये गुंतवलेली असून उर्वरीत ₹ ३१३.३७ कोटीची गुंतवणूक बिगर वैधानिक तरलतेचे रोखे व ₹ ७७२.०९ कोटींची गुंतवणूक ही राष्ट्रीयकृत बँका, राज्य व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, खाजगी बँकांमध्ये मुदतठेवींच्या स्वरुपात गुंतवलेली आहे. इतर संस्था व बँकांसोबतचे शेअर्स ₹१.०४ कोटी इतके आहेत. तसेच कॉल मनीमध्ये ₹ २५.०० कोटी आणि ₹ ७५.०० कोटींची गुंतवणूक Standing Deposit Facility (SDF) मध्ये केलेली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशाचे बँक पालन करते.

आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान रिझर्व्ह बँकेने आर्थिक वाढीस चालना देण्यासाठी धोरणात्मक रेपो दर (Policy Repo Rate) ६.२५% वरुन ५.२५ % पर्यंत कमी केला. महागाईचा दर रिझर्व्ह बँकेच्या निर्धारित लक्ष्य मर्यादेत राहिला असून, सलग व्याजदर कपातीनंतर चलनविषयक धोरणाचा दृष्टिकोन तटस्थ (Neutral) करण्यात आला. यामुळे आर्थिक वाढ आणि किंमत स्थैर्य यामध्ये संतुलित दृष्टिकोन अवलंबिण्यात आल्याचे दिसून येते.

अहवाल वर्षात बँकेने HTM वरुन AFS कॅटेगरी मध्ये सरकारी रोख्यांचे स्थलांतर (Shifting) रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार केलेले आहे. बँकेने सरकारी रोखे पुस्तकी किंमत ₹ १३९.७९ कोटी HTM वरुन AFS कॅटेगरी मध्ये स्थलांतर (Shifting) केलेले आहे. असे करतांना बँकेला घसारापोटी काही तरतूद करावी लागली नाही.

बँकेने गुंतवणूक व्यवस्थापन करताना नफा क्षमता, तरलता आणि नियामक अनुपालन यामध्ये योग्य समतोल राखला आहे. गुंतवणूक घसारा राखीव निधी (Investment Depreciation Reserve-IDR) ₹ ०.६० कोटी वरुन वाढून ₹ १.२५ कोटी इतका झाला आहे. तसेच गुंतवणूक मुल्य चढ-उतार राखीव निधी (Investment Fluctuation Reserve-IFR) ₹ ४५.१८ कोटी वरुन वाढून ₹ ४९.७६ कोटी इतका झाला आहे. गुंतवणकीसंदर्भातील IDR ची तरतूद रिर्झव्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात आली आहे.

नफा :-

आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर बँकेचा निव्वळ नफा हा ₹ ६५.६५ कोटी इतका आहे.

(रक्कम ₹ कोटीत)

तपशील	२०२५-२६	२०२४-२५
कर व तरतुदीपूर्वीचा नफा	९०.५७	८७.९०
कर व तरतुदीनंतरचा नफा	६५.६५	५९.७८

नफा वाटणी :-

आपल्या बँकेचा मल्टी स्टेट को. ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्ट, २००२ च्या कलम ६२ अन्वये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता निव्वळ नफा ₹ ६५.६५ कोटी वाटणीसाठी उपलब्ध आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील शिल्लक असलेला नफा ₹ ८.४८ कोटी आणि रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने ₹ ०.१२ कोटी इतर निधी मधून वर्ग केले असता मल्टी स्टेट को. ऑपरेटीव्ह सोसायटीज् ॲक्ट, २००२ च्या कलम ६३ अन्वये एकूण ₹ ७४.२५ कोटी इतका नफा खालीलप्रमाणे वाटणीसाठी संचालक मंडळ शिफारस करीत आहे.

(रक्कम ₹ कोटीत)

तपशील	रक्कम
राखीव निधी २५%	१६.४१
संभाव्य तोटा / नुकसानीसाठी केलेला राखीव निधी (१०%)	६.५७
सहकार शिक्षण निधी (१%)	०.६५
सहकारी पुनर्वसन पुनर्रचना आणि विकास निधी (१%)	०.६५
लाभांश १५% (शिफारस)	१३.७४
सानुग्रह अनुदान व बोनस	१०.२६
विशेष राखीव निधी (u/s 36 (i)(viii) of I.T. Act, 1961)	३.००
गुंतवणूक चढउतार निधी	०.४२

(रक्कम ₹ कोटीत)

तपशील	रक्कम
इमारत निधी	१०.००
निवडणूक निधी	०.५०
पुढील वर्षासाठी शिल्लक नफा	१२.०५
एकूण	**७४.२५**

लाभांश :-

भविष्यकाळातील वाढीसाठी तसेच सक्षम भांडवल पर्याप्तता राखण्यासाठी पुरेसा नफा पुढील वर्षासाठी वर्ग करून अहवाल वर्ष २०२५-२६ करिता हे संचालक मंडळ १५% लाभांश भागधारण प्रमाणानुसार (pro-rata पद्धतीने) देण्याची शिफारस करीत आहे.

भांडवल पर्याप्तता :-

रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांसाठी भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण १२.००% इतके निश्चित केले आहे. तसेच (ECBA) आर्थिकदृष्टया सक्षम व सुव्यवस्थापित बँकांसाठी असे प्रमाण १३.००% निश्चित केले आहे. अहवाल वर्षअखेर आपल्या बँकेचे भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण १९.३१% असून यापैकी टीयर १ कॅपीटल भांडवल पर्याप्ततेच्या १६.४५% आहे. (मागील वर्षी १६.८१%) या तुलनेत दि. ३१.०३.२०२५ अखेर हे प्रमाण १९.६७% इतके होते.

संचालक मंडळ सभा :-

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १४ सभा झाल्या आहेत. सभेस सर्व सभासदांची उपस्थिती समाधानकारक असून सर्व विषयांवर साधक बाधक चर्चा होऊन एकमताने निर्णय घेतले जातात.

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांना अधिन राहून तसेच बँकेच्या उपविधी क्र. ४३ नुसार संचालक मंडळाच्या इतर कमिट्यांची रचना केलेली असून त्यामध्ये १) कार्यकारी समिती, २) ऑडीट समिती, ३) वसुली समिती, ४) कर्मचारी उपसमिती, ५) जोखीम व्यवस्थापन समिती, ६) सहेतूक कर्ज बुडवे (Review Committee of Wilful defaulters), ७) IT Strategy Committee इत्यादी समित्या तसेच बँकेच्या अधिकाऱ्यांच्या विविध समित्यांची स्थापना केलेली आहे. त्यामध्ये १) सिनिअर एक्झीक्युटीव्ह कमिटी (SEC) २) Identification committee of Wilful Defaulters या समित्यांना अधिकार प्रदान केल्यामुळे संबंधित अधिकार वर्गाची निर्णय क्षमता गुणवत्तेचा दर्जा उंचावला असून निर्णय क्षमतेत समाधानकारक प्रगती झाली आहे.

बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सभा :-

अहवाल वर्षात बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या ११ सभा घेण्यात आल्या. सभेस सर्व सदस्यांची उपस्थिती समाधानकारक असून सर्व विषयांवर साधक-बाधक चर्चा होऊन एकमताने संचालक मंडळास शिफारशी केल्या जातात.

जोखीम व्यवस्थापन कार्यप्रणाली :-

आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वांनुसार बँकेकडे जोखीम व्यवस्थापनासाठी एक कार्यप्रणाली आहे. बँकेकडे एक जोखीम व्यवस्थापन विभाग आणि संचालक मंडळ स्थरावरील जोखीम व्यवस्थापन समिती (RMC) आहे. जोखीम व्यवस्थापन विभागाचे प्रमुख मुख्य जोमीख अधिकारी (CRO) असतात, जे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक मंडळाच्या सदस्यांची जोखीम व्यवस्थापन समिती (RMC) यांना अहवाल सादर करतात. जोखीम व्यवस्थापन समिती जोखीम व्यवस्थापनाच्या कार्यांकडे देखरेख ठेवते आणि जोखीम व्यवस्थापनाशी संबंधित बाबींमध्ये संचालक मंडळाला सूचना देते. बँकेने पत जोखीम, बाजार जोखीम, कार्यान्वयन जोखीम आणि एकात्मिक जोखीम धोरणे तयार केली आहेत, आणि जोखीम व्यवस्थापन विभाग या धोरणांच्या कक्षेत राहून कार्य करतो. बँकेने त्यांच्या जोखीम स्वीकारण्याच्या विवरणात (Risk Appetite Statement) पत, बाजार, व्याजदर, कार्यान्वयन आणि तरलता जोखीमींसाठी जोखीम क्षमता आणि जोखीम सहनशीलतेची पातळी निश्चित केली आहे. RMC ची बैठक दर तिमाहीने होते आणि त्यात बँकेच्या जोखीम व्यवस्थापनाच्या आराखड्यावर विविध जोखीम-संबंधित मुद्यांवर चर्चा केली जाते, तसेच बँकेच्या जोखीम स्वीकारण्याच्या विवरणाचा आढावा घेतला जातो. जोखीम विभाग आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केलेल्या इतर विविध मर्यादांसह जोखीम सहनशीलतेच्या मर्यादांवर देखरेख ठेवतो आणि RMC ला अहवाल सादर करतो.

शाखा स्थलांतर :-

बँकेच्या आजमितीस एकूण ९१ शाखा ७९ ऑनसाईट व २ ऑफसाईट एटीएमस् ग्राहकांच्या सेवेकरिता कार्यरत आहेत. अहवाल वर्षात रिझर्व्ह बँकेने दिलेल्या परवानगीनुसार बँकेने ग्राहकांना अधिक सोयीस्कर, प्रशस्त व ग्राहकाभिमुख सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने (१) वडखळ शाखा ''तळमजला, घर क्र. १२९अे, क्षुधा शांती भुवन, पोस्ट वडखळ, ता. पेण, जि. रायगड-४०२१०७'' येथे दि. ०८ सप्टेंबर, २०२५ रोजी, (२) पेण शाखा ''शॉप नं. १,२,३, तळमजला, अंतिम प्लॉट नं. ५३, पेण अंतोरे रोड, ता. पेण, जि. रायगड-४०२१०७'' येथे दि. २७ ऑक्टोबर, २०२५ रोजी व (३) कामोठे शाखा ''शॉप नं. २८ व २९, तळमजला, शिवकल्पतरू आर्केड-२, प्लॉट नं. १ सेक्टर-१७, कामोठे, नवी मुंबई, ता. पनवेल-४१०२०९'' येथे दि. १५ डिसेंबर, २०२५ रोजी भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या जागेमध्ये स्थलांतरीत केल्या आहेत. रिझर्व्ह बँकेच्या (Urban Co-operative Banks-Branch Authorisation) Direction, 2025 नुसार बँकेच्या (१) मालाड (पश्चिम) शाखा (२) निपाणी शाखेचे नवीन जागेत स्थलांतर करण्यात आले आहे.

रिझर्व्ह बँकेच्या या नवीन मार्गदर्शक तत्वांचा लाभ घेत, ज्या ठिकाणी व्यवसाय वाढीची संधी उपलब्ध आहे अशा भागांमध्ये बँकेच्या शाखाजाळ्याचा विस्तार करण्याचा बँकेचा मानस आहे.

नॉन बँकिंग व्यवसाय :-

विमा व्यवसाय :-

बँकिंग व्यवसायातून येणाऱ्या उत्पन्नाव्यतिरिक्त इतर उत्पन्न वाढविण्यासाठी बँकेने मे. टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लि., व मे. बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांच्याबरोबर सर्वसाधारण विम्याबाबत कॉर्पोरेट एजन्सीचे करार केले आहेत. बँकेने कर्जासाठी स्वीकारलेल्या सर्व प्रकारच्या तारणाचा (उदा. वाहन, मशिनरी, घर तारण इत्यादी.) विमा काढून सदर कर्जे विमा छत्रांखाली सुरक्षित केली आहेत. तसेच जर एखाद्या कर्जदारासंदर्भात एखादी दुर्घटना घडल्यास त्याच्या पश्चात त्याच्या कर्जरक्कमेची परतफेड सुलभ व्हावी यासाठी बँकेने क्रेडिट लाईफ इन्शुरन्स व लाईफ इन्शुरन्स (जीवन विमा) करिता मे. कोटक महिंद्रा लाईफ इन्शुरन्स कंपनी लि. बरोबर कॉर्पोरेट एजन्सी करार केला आहे. कर्जाची परतफेड सुलभ व्हावी

यासाठी बँकेने क्रेडिट जीवन विमा सुरु केला आहे, या व्यतिरिक्त, ग्राहकांसाठी वैयक्तिक जीवन विमा उत्पादने उपलब्ध करुन देण्यासाठी बँकेने (AXIS-Max) लाईफ इन्शुरन्स कंपनीशी देखील करार केला आहे. तसेच बँकेने ग्राहकांना बचत व भविष्याची तरतूद यासाठी लाईफ इन्शुरन्स उपलब्ध करुन दिला आहे. बँकेच्या सर्व ग्राहक आणि सभासदांनी सदर विमा योजनांचा लाभ घ्यावा.

प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना :-

सदर आर्थिक वर्षात प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजनेमध्ये एकूण ५३६० खातेदारांनी नोंदणी केली त्यामध्ये एकूण ३ मृत्यू दावे आले. त्यापैकी सर्व मृत्यू दावे मंजूर होऊन प्रत्येकी ₹ २ लाख रक्कम वारसाच्या खाती जमा करण्यात आली. तसेच एकूण १०१३० खातेदारांनी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेखाली नोंदणी केली. तरी शासनाच्या या विमा योजनांचा जास्तीत जास्त खातेदारांनी लाभ घ्यावा ही विनंती.

विदेशी विनिमय व्यवहार :-

बँकेला रिझर्व्ह बँकेकडून फॉरेन एक्सचेंज ॲथोराईज्ड डिलर कॅटेगरी २ (AD-II) परवाना मिळाला आहे. यामुळे ग्राहकांना विदेशी चलनाची खरेदी विक्री आपल्या शाखांमधून करता येऊ लागली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सदर AD-II परवाना अंतर्गत बँकेने विदेशी चलन खरेदी विक्रीचा व्यवसाय ₹ ८५.१४ कोटी इतका केला आहे.

बँकेच्या ग्राहकांना आयात-निर्यात व्यवहारासंबंधित सेवा पुरविण्यासाठी आपल्या बँकेने इतर AD-I बँकांशी सहकार्य करार केले आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सदर AD-I बँकांमार्फत आपल्या बँकेने हाताळलेला आयात-निर्यात व्यवहार ₹ २१.७९ कोटी होता. या व्यवहारातून सन-२०२५-२६ मध्ये बँकेने ₹ ४.६२ लाख इतका नफा मिळविला आहे. तसेच बँकेला ठराविक १८ शाखांमधून एनआरई खाती उघडण्याकरिता रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने परवानगी दिलेली आहे. बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे AD-I परवाण्यासाठी अर्ज केलेला आहे.

माहिती तंत्रज्ञान व डिजिटल बँकिंग :-

बँकिंग झाले सोपे

बँकिंग तंत्रज्ञान सतत विकसित होत आहे आणि ते आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनले आहे. ग्राहकांच्या दैनंदिन बँकिंग गरजा पूर्ण करण्यासाठी जीपी पारसिक बँक देशातील आघाडीच्या बँकांप्रमाणेच सर्व समावेशक डिजिटल सेवांची श्रेणी उपलब्ध करुन देते. आमच्या ग्राहकांकडून डिजिटल सेवांचा वापर झपाट्याने वाढत आहे. आम्ही इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, UPI (BHIM App), रुपे प्लॅटिनम कॉन्टॅक्टलेस डेबिट कार्ड, एटीएम रिसायक्लर, एटीएम, ई-स्टेटमेंट्स, क्यूआर कोड पेमेंट स्वीकृती सुविधा यासारख्या सेवा प्रदान करतो.

आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान, बँकेने १० कोटींहून अधिक आर्थिक डिजिटल व्यवहार केले आहेत; यामध्ये युपीआयचा वाटा सर्वाधिक असून ९.३५ कोटी व्यवहार आणि सुमारे १६०७७ कोटी रुपयांहून अधिक रकमेचे व्यवहार झाले आहेत.

सायबर सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सायबर धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी, आम्ही सर्व वर्कस्टेशन अद्ययावत ऑपरेटींग सिस्टिम्सवर कार्यान्वित केली आहेत आणि एंडपॉईड डिटेक्शन ॲण्ड रिस्पॉन्स (EDR) सह मजबूत एंडपॉइंट सुरक्षा लागू केल्या आहेत. सॅण्डबॉक्सिंग क्षमता असलेल्या प्रगत इमेल गेटवे सुरक्षा प्रणालीद्वारे आम्ही आमचे नेटवर्कचे ईमेल फिशिंग स्पायवेअर आणि स्पॅमपासून संरक्षण करतो. याव्यतिरिक्त, आमच्या बहु-स्तरीय सुरक्षा प्रणालीमध्ये डेटा लॉस प्रिव्हेन्शन (DLP) नेटवर्क ॲक्सेस कंट्रोल (NAC) वेब ॲप्लिकेशन फायरवॉल्स (WAF), नेक्स्ट-

जनरेशन फायरवॉल्स (NGFW) आणि सुरक्षित 'SD-WAN' आर्किटेक्चरचा समावेश आहे. ग्राहकांना प्रत्यक्ष फसवणुकीपासून (Physical Fraud) वाचवण्यासाठी सर्व एटीएम आणि रिसायक्लर मशीन्समध्ये अत्याधुनिक अँटी-स्किमिंग तंत्रज्ञान बसवण्यात आले आहे. तसेच, व्हॉइस-कॉल फसवणूक रोखण्यासाठी RBI आणि DoT च्या निर्देशांचे पालन करत, बँकेने क्लाउड-आधारित कॉलिंग प्रणाली सुरु केली आहे. आता ग्राहकांना सेवा आणि व्यवहारांशी संबंधित सर्व अधिकृत कॉल केवळ आमच्या प्रमाणित क्रमांकावरुन (१६००२१३७३१) येतील.

अखेरीस, तंत्रज्ञांनाबरोबरच ते वापरणारे तंत्रज्ञ तसेच बँकेचे अधिकारीसुद्धा तितकेच सक्षम असले पाहिजेत. म्हणूनच आमच्या कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेबाबत नियमित प्रशिक्षण देऊन, आम्ही संस्थेच्या सर्व स्तरांवर सक्रिय सायबर सुरक्षा संस्कृती यशस्वीपणे रुजवली आहे.

मनुष्यबळ :-

बँकेचे मानवसंसाधन विभाग हे, कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिगत आणि संस्थात्मक कौशल्ये, ज्ञान आणि आव्हानात्मक परिस्थितीशी सामोरे जाण्याची क्षमता विकसित करुन त्यांची कामगिरी वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. बँक देखील कर्मचाऱ्यांचे कौशल्य व ज्ञान वाढविण्यासाठी वेगवेगळी प्रशिक्षणे आयोजित करते. तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया CAB, MUCBF, NIBM व इतर सरकारी प्रशिक्षण संस्थांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षणाकरिता कर्मचाऱ्यांना पाठविण्यात येते. तसेच संचालक मंडळानेही सायबर प्रशिक्षणात भाग घेतला आहे.

अहवालवर्षात रिझर्व्ह बँक व इतर सरकारी प्रशिक्षण संस्थांनी आयोजित केलेल्या ४६ प्रशिक्षण कार्यक्रमांकरिता ३४१ अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले. तसेच एकूण १००० कर्मचाऱ्यांकरिता ३२ अंतर्गत प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित केले गेले. यामध्ये जोखमीवर आधारित अंतर्गत लेखापरिक्षण प्रशिक्षण (RBIA), क्रेडिट मॅनेजमेंट, सहकारी बँकांमधील मानव संसाधन विभागाचे प्रशिक्षण, सिबिल सक्षम आणि ई-लर्निंग कार्यक्रम, वसुली कायदा प्रशिक्षण, (मनी लॉडरिंग विरोधी (AML) कॉम्बेटींग फायनान्सींग टेरीरीझम (CFT)) आणि तणाव व्यवस्थापन, सायबर सुरक्षा कार्यक्रम, फसवणूक जोखीम व्यवस्थापन, बनावट नोटा ओळखणे, POSH, सोने तारण कर्ज, प्रभावी नेतृत्व आणि NDP, किरकोळ कर्ज पुरवठा आणि किरकोळ कर्जाचे विपणन, इंटरनेट आणि मोबाईल बँकिंग, व्यवसाय विकास धोरण आणि सॉफ्ट स्किल्स, अनुपालन आणि केवायसी मार्गदर्शक तत्वे, ग्राहकसेवा तक्रारी आणि निवारण यंत्रणा, रोख व्यवस्थापन, फसवणूक प्रतिबंध आणि व्यवसाय सातत्य आणि संकट व्यवस्थापन इत्यादी विविध विषयांचा समावेश होता. बँकेने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांशी सलोख्याचे संबंध ठेवले आहेत. जीपी पारसिक बँक कर्मचारी व अधिकारी संघटनेने ग्राहकसेवा व उत्पादन क्षमता वाढविण्याकरिता दिलेले संपूर्ण सहकार्य व सहयोगाकरिता बँक आभारी आहे.

सामाजिक बांधीलकी :-

१) दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ रोजी जीपी पारसिक बँक एम्प्लॉईज ॲण्ड ऑफिसर्स असोशिएशने बँकेच्या मुख्य कार्यालय येथे रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. त्यास कर्मचारी, सभासद आणि ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

२) बँकेने यावर्षी सभासदांवर अवलंबुन असलेल्या ३ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता ₹ ६,०००/-आर्थिक मदत दिली आहे.

३) बँकेने यावर्षी ६ सभासदांना ₹ ७५,०००/- वैद्यकीय मदत दिली आहे.

४) वनीकरण :- बँकेचे संस्थापक-अध्यक्ष स्वर्गीय गोपीनाथ पाटील साहेबांनी सहकार, सामाजिक व शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटविण्याबरोबरच वनीकरणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी या क्षेत्रातील सहकाऱ्यांना प्रेरित केले. सदर सहकारी आणि सहकार बझार कळवा, यांच्या सहकार्याने आपली बँक पारसिक हिलवर सातत्याने वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन मोहिम राबवित आहे. आज वनीकरण ही काळाची गरज असून, पारसिक डोंगराच्या

वनीकरणाबरोबरच बँकेने कळवा, विटावा व पारसिक परिसरामध्ये रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या विविध वृक्षांमुळे हिरवागार झालेला परिसर साऱ्यांना प्रसन्न करत आहे.

हिशोब तपासणी :-

बँकेमध्ये समावर्ती व प्रोसेस अंतर्गत लेखापरीक्षण करण्यात येते. बँकेचे मुख्य कार्यालय व ९१ शाखांचे समावर्ती / प्रोसेस हिशोब तपासणी करण्यासाठी बँकेने अनुभवी व्यावसायिक सनदी लेखापालांची नियुक्ती केलेली आहे. तसेच बँकेच्या अंतर्गत तपासणी विभागातील अधिकाऱ्यांकडून बँकेच्या सर्व ९१ शाखांची अंतर्गत हिशोब तपासणी केली जाते. तसेच रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार बँक मुख्य कार्यालयातील सर्व विभागांचे व सर्व शाखांचे रिस्क बेस इंटरनल ऑडीट (RBIA) करीत आहे. बँकेची लेखापरीक्षण समिती बँकेच्या हिशोब तपासणी कारभारावर देखरेख ठेवते. तसेच सदर समिती वैधानिक लेखापरीक्षण, समावर्ती लेखापरीक्षण व अंतर्गत हिशोब तपासणी अहवालातील त्रुटींच्या पूर्ततेबाबत दक्ष असते. अहवाल वर्षात रिझर्व्ह बँकेच्या सिनिअर सुपरवायझरी मॅनेजर (SSM) आणि इतर अधिकाऱ्यांनी आपल्या बँकेच्या कामकाजाचे दि.१.४.२०२४ ते ३१.३.२०२५ या कालावधीचे लेखापरीक्षण/तपासणी केली आहे. तपासणी अधिकाऱ्यांनी परीक्षण कालावधीमध्ये बँकेच्या कामकाजात सुधारणा करण्याच्या दृष्टीने विविध मौलिक सूचना केल्या असून सदर सूचनांबद्दल बँक त्यांचे आभार व्यक्त करत आहे. तसेच रिझर्व्ह बँकेच्या तपासणी अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाची पूर्तता वेळेत केलेली आहे. सन २०२६-२७ च्या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मे. प्रकाश जी. पाठक ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस् यांची वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्तीस मान्यता दिला आहे.

श्रध्दांजली :-

बँकेचे ज्येष्ठ संचालक श्री. दशरथ दत्तु घरत यांना दि. ०६ सप्टेंबर, २०२५ रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्या आकस्मित निधनाने बँकेचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांना बँकेतर्फे विनम्र श्रध्दांजली !

तसेच अहवाल वर्षात देवाज्ञा झालेले बँकेचे सभासद, खातेदार, कर्मचारी, हितचिंतक, शहिद झालेले सैनिक यांना बँकेतर्फे विनम्र श्रध्दांजली !

गौरव :-

चालू आर्थिक वर्षात बँकेस पुढील प्रमाणे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

१) दि महाराष्ट्र अर्बन को. ऑप. बँक फेडरेशन लि. यांच्यातर्फे "₹ २५०० कोटींचे वर ते ₹ ५००० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँका" या गटातून प्रथम क्रमांकाचा "**सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार**"

२) FCBA बँकिंग फ्रंटियर तर्फे मोठ्या सहकारी बँकांच्या श्रेणीमध्ये बुडीत कर्जाचे उत्तम व्यवस्थापना बद्दल "**BEST NPA MANAGEMENT**" **विशेष पुरस्कार** तसेच

३) FCBA बँकिंग फ्रंटियर तर्फे मोठ्या सहकारी बँकांच्या श्रेणीमध्ये "**BEST COMPLIANCE TRANSFORMATION**" **विशेष पुरस्कार**

४) राष्ट्रीय अर्बन को-ऑप. बँकिंग अवॉर्ड्स २०२६ यांच्यातर्फे बँकेला १) "**सर्वोत्तम NPA व्यवस्थापन**" २) "**सर्वोत्तम CBS IMPLEMENTATION**" ३) "**सर्वोत्तम BEST CLOUD IMPLEMENTATION**" या तीन पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

५) पान मार्केटिंग चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे बँकेला कोकण विभागातून "**सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार**" प्रदान करण्यात आला आहे.

ऋणनिर्देश :-

बँकेच्या प्रगतिशील वाटचालीतील माझे सहकारी, सभासद, मार्गदर्शक, आजी व माजी संचालक, हितचिंतक या साऱ्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. बँकेच्या सर्व संचालकांचे मौलिक मार्गदर्शन, सहकार्य यामुळेच बँकेची सर्वांगीण प्रगती झाली आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. बँकेचे अंतर्गत लेखापरीक्षक, वैधानिक लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे. भारतीय रिझर्व्ह बँक, केंद्रिय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली, मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा राज्य, तसेच संबंधित जिल्हा उप-निबंधक यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. बँकेचे कार्यक्षम अधिकारी व कर्मचारी यांचेकडून प्रगतिच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांच्या सहकार्याची अपेक्षा करुन हा अहवाल पूर्ण करतो.

जयहिंद ! जय सहकार !

आपला विश्वासू,
विक्रम गोपीनाथ पाटील
अध्यक्ष

55th Annual Report - Year 2025-26

Respected Members,

By invoking the sacred memories of founder Chairman of the Bank, late Shri. Gopinath Shivram Patil Saheb, on behalf of the Board of Directors, I extend warm welcome to all of you at the 55th Annual General Meeting of the Bank. I am very glad to present this 55th Annual Report for the year 2025-26 along with Audited Balance sheet and Profit and Loss account for the year ended 31st March, 2026.

Economic Scenario :- Global

"Un-certainties are the most certain thing in the today's financial world". The West Asia conflict had major impact on the global economies. The Brent crude oil prices have remained highly volatile due to West Asia conflict and closure of Strait of Hormuz. The prices of Brent crude oil was US$ 74.49 per barrel at the beginning of the year which declined to US$ 58.92 per barrel in December 25 and again rose to US$ 107.93 in March 26.

The Indian Rupee depreciated against the US dollar during the FY 25-26, due to the uncertainties and disruptions in global trade. The exchange rate of USD was at ₹ 85.60 at the beginning of the year and it rose to ₹ 94.65 at the end of March 2026.

Global growth is expected to be at 3.3% with key risks of potential escalation in West Asia conflicts and tariff threats, which has created considerable uncertainty about the future trajectory of inflation and growth.

Economic Scenario: - India

The RBI's projection of inflation (CPI) for FY 25-26 was 4% which was revised to 2% in December 25, due to correction in food prices. The inflation rose to 3.2% in February 2026 with introduction of new CPI series (2024 = 100), the RBI's revise inflation estimate is 4.1% for FY 25-26. RBI's projection of inflation for FY 2026-27 is 4.6%.

The real GDP growth for FY 25-26 was estimated at 7.6% which was 7.1% in FY 24-25. The growth was supported by rising household consumption, stable inflation and lower interest rates. The Indian economy continues to register high growth despite a challenging external environment coupled with geo-political uncertainties. Thus Indian economy is making steady progress with price stability and sustained growth.

Indian Banking Sector: -

The RBI reduced Policy Repo Rate by 100 bps, from 6.25% to 5.25% during the year, further the CRR was also reduced by 100 bps from 4.00% to 3.00%. RBI also changed it's policy stance twice in this year, first in April 25 from 'Neutral' to 'Accomodative' again reverse the same from "Accomodative" to "Neutral" in June 25 and maintained same throughout the year. The Indian Banking sector remained healthy with good system level parameters like capital adequacy, liquidity, asset quality and profitability. The Indian Banking sector this year witnessed improvement in their balance sheets, liquidity buffers, profitability and reduction in gross NPA ratios with year on year growth in credit at 14.3% in FY 25-26 compared to 11.7% in FY 24-25. Banks and financial institutions are supporting economic activity through sustained credit expansion.

Future Outlook:-

Global growth outlook remains uncertain amid ongoing energy supply disruption, persistent geopolitical tensions, shortage of inputs for various industries and volatile financial markets. The flow funds to safe –

heaven have depreciated major currencies against US dollar.

The fundamentals of Indian economy are on a stronger footings supported by stability on three fronts – prices, financials & political. Domestic economy registered growth till February 2026 but will likely to slow down due to West Asia Conflict on account of elevated oil prices, disruption in energy supply which may adversely affect industry, agriculture & services. The emergence of adverse climatic "El Nino" conditions is a contingent risk to the growth. RBI has project GDP growth of 6.9% for FY 26-27.

Highlights of Financial Performance of the Bank:-

Against the above stated backdrop the financial performance of the bank was very good. The business Mix of the Bank stood at ₹ 8200.01 Crore and net profit after tax at ₹ 65.65 Crore.

(₹ in Crore)

Particulars	31.03.2026	31.03.2025	Increase/(decrease)
